पुढारी

# सभासदांच्या प्रशिक्षणासाठी 'रवळनाथ'ला ४ लाखांचे अनुदान

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

नवी दिल्ली येथील भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाकडून श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीला सभासद प्रशिक्षण व डिजिटलायझेशनसाठी मिळून ४ लाखांचे अनुदान मिळाले. संघाकडून गेल्या ३ वर्षांपासून आजअखेर एकूण ११ लाखांचे अनुदान मिळाले आहे, अशी माहिती संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.



**एम. एल. चौगुले**

चौगुले म्हणाले, १८ मार्च २०१५ रोजी संस्थेस मल्टिस्टेट दर्जा मिळाला. त्यानंतर संस्था - राष्ट्रीय सहकारी संघाची सक्रिय सभासद झाली आहे. त्यामुळेच सभासदांचे प्रशिक्षण, संचालकांचा अभ्यास दौरा व डिजिटलायझेशन आदींसाठी भरीव स्वरूपाच्या अनुदानाचा लाभ मिळत आहे.

यापूर्वी संघाकडून मिळालेल्या अनुदानातून गडहिंग्लज, आजरा, जयसिंगपूर व बेळगाव येथे सभासदांसाठी प्रशिक्षण शिबिरे घेतली असून, जवळपास ४०० संस्था सभासदांनी त्याचा लाभ घेतला आहे.

My Kolhapur Edition
Aug 20, 2021 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

पुण्यनगरी

# सभासदांच्या प्रशिक्षणासाठी रवळनाथला ४ लाखांचे अनुदान

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

नवी दिल्ली येथील भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाकडून रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीला सभासद प्रशिक्षण व डिजिटलायझेशनसाठी मिळून ४ लाखांचे अनुदान मिळाले. संघाकडून गेल्या ३ वर्षांपासून आजअखेर एकूण ११ लाखांचे अनुदान मिळाले असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, १८ मार्च २०१५ रोजी संस्थेस मल्टी स्टेट दर्जा मिळाला. त्यानंतर संस्था राष्ट्रीय सहकारी संघाची सक्रिय सभासद झाली आहे. त्यामुळेच सभासदांचे प्रशिक्षण, संचालकांचा



एम. एल. चौगुले

अभ्यासदौरा व डिजिटलायझेशन आदीसाठी भरीव स्वरूपाच्या अनुदानाचा लाभ मिळत आहे. यापूर्वी संघाकडून मिळालेल्या अनुदानातून गडहिंग्लज, आजरा, जयसिंगपूर व बेळगाव येथे सभासदांसाठी प्रशिक्षण शिबिरे घेतली असून जवळपास ४०० संस्था सभासदांनी त्याचा लाभ घेतला आहे. इतक्या वर्षी अशाप्रकारचे अनुदान मिळवणारी रवळनाथ ही बहुधा महाराष्ट्रातील एकमेव संस्था असल्याचे चौगुले यांनी सांगितले.

लोकमत

# प्रशिक्षणासाठी 'खळनाथ'ला चार लाखांचे अनुदान

लोकमत न्यूज नेटवर्क

गडहिंग्लज : नवी दिल्ली येथील



भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाकडून श्री खळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीला सभासद प्रशिक्षण व डिजिटलायझेशनसाठी मिळून चार लाखांचे अनुदान मिळाले. गेल्या तीन वर्षांत मिळून संघाकडून एकूण ११ लाखांचे अनुदान मिळाले आहे, अशी माहिती संस्थापक-अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, १८ मार्च, २०१५ रोजी संस्थेस मल्टिस्टेट दर्जा मिळाला. त्यानंतर संस्था राष्ट्रीय सहकारी संघाची सक्रिय सभासद झाली आहे. त्यामुळेच सभासदांचे प्रशिक्षण, संचालकांचा अभ्यासदौरा व डिजिटलायझेशन, इत्यादींसाठी अनुदानाचा लाभ मिळत आहे.

यापूर्वी संघाकडून मिळालेल्या अनुदानातून गडहिंग्लज, आजरा, जयसिंगपूर, बेळगाव येथे सभासदांसाठी प्रशिक्षण शिबिरे घेतली आहेत. त्यांचा ४०० सभासदांनी लाभ घेतला आहे. अशा प्रकारचे अनुदान मिळविणारी 'खळनाथ' ही महाराष्ट्रातील एकमेव संस्था आहे, असेही चौगुले यांनी सांगितले.

Hello Kolhapur Gramin
Page No. 3 Aug 19, 2021
Powered by: erelego.com

# सभासदांच्या प्रशिक्षणास 'रवळनाथ'ला अनुदान

प्रतिनिधी

गडहिंग्लज

दिल्ली येथील भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाकडून रवळनाथ को. ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीला सभासद प्रशिक्षण व आधुनिकीकरणासाठी ४ लाखाचे अनुदान मिळाले आहे. आतापर्यंत ३ वर्षात ११ लाखाचे अनुदान मिळाल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली. संस्थेला मल्टी स्टेटचा दर्जा असून राष्ट्रीय सहकारी संघाचे सभासद आहेत. या संस्थेकडून संस्थेला अनुदान मिळते. संस्थेने यापुर्वी गडहिंग्लज, आजरा, जयसिंगपूर व बेळगाव येथे सभासदांसाठी प्रशिक्षण शिबीर घेतले असून सुमारे ४०० सभासदांना याचा लाभ झाला आहे.